वर्ष- ११ | अंक- ०४ | मुंबई, मंगळवार, १० डिसेंबर ते १६ डिसेंबर २०२४ | पृष्ठ-४
मूल्य २/- रुपये
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA
पोलीस बातमी पत्र
• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

PG 2
शॉपिंग करताना हे लक्षात ठेवा!

3 → दूरदृष्टीचे राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर
एमएमआरडीचा हलगर्जीपणा... मीरा-भाईंदरच्या काशिमीरा परिसरात रस्त्याला भगदाड ← 4

# पंतप्रधान मोदींना पुन्हा जीवे मारण्याची धमकी; मुंबई पोलिसांना धमकीचा संदेश मिळाल्याने खळबळ, तपास सुरु



**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून मुंबई पोलीस आणि ट्रॅफिक कंट्रोलला धमक्यांचे फोन येत असल्याच्या घटना समोर येत आहेत. यातच आज (७ डिसेंबर) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा संदेश मुंबई पोलिसांच्या ट्रॅफिक हेल्पलाइन व्हॉट्सॲप नंबरवर आला असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. हा धमकीचा संदेश मिळताच पोलिसांनी तातडीने तपासाला सुरुवात केल्याचं सांगण्यात येत आहे.

मुंबई पोलिसांनी त्यांच्या ट्रॅफिक हेल्पलाइन व्हॉट्सॲप नंबरवर पंतप्रधान मोदी यांना आयएसआय एजंट समावेश असलेल्या धमकीचा मेसेज मिळाल्यानंतर पोलिसांनी एफआयआर नोंदवला आहे. तसेच हा धमकीचा मेसेच राजस्थान येथील अजमेरमधून आला असल्याची माहिती पोलिसांनी शोधून काढली आहे. आरोपींचा माग काढण्यासाठी पोलिसांचे पथक रवाना झाल्याची माहिती देखील सांगण्यात येत आहे. यासंदभार्तील वृत्त इंडियन एक्स्प्रेसनं दिलं आहे.

दरम्यान, एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं की, हेल्पलाइन आलेल्या संदेशात दोन आयएसआय एजंटचा सहभाग आणि मोदींवर बॉम्ब हल्ला करण्याचा कट रचल्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. दरम्यान, याआधीही अशा प्रकारची जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी मिळाल्यानंतर पोलीस अलर्ट झाले असून या प्रकरणाचा तपास सुरु करण्यात आला आहे.

दरम्यान, अशा प्रकरणांमध्ये याआधी पोलिसांना असंही आढळून आलेलं आहे की, काही लोक दारूच्या नशेत किंवा मानसिक आरोग्याच्या समस्यांनी ग्रस्त असल्याने असे धमकीचे संदेश पाठवतात. मुंबई पोलिसांना मिळालेले बहुतांश धमकीचे संदेश त्यांच्या एकमेव व्हॉट्सॲपवर येतात. जो ट्रॅफिक पोलीस हेल्पलाइन म्हणून वापरण्यात येतो. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धमकी देणारी व्यक्ती दारूच्या नशेत असावी किंवा मानसिकदृष्ट्या समस्यांनी ग्रस्त असावी, असाही संशय व्यक्त करण्यात येत असल्याचं एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं आहे.




# बंद खोलीत रक्ताचा सडा; कळंबोलीत स्थानिकांमध्ये भितीचं वातावरण

**कळंबोली:** कळंबोली परिसरात एका ओसाड खोलीत रक्ताचा सडा पडल्याने एकच खळबळ उडाली आहे. पनवेल ग्रामीण कळंबोली वसाहतीमधील एका उद्यानात पालिकेमार्फत काही खोल्या बांधण्यात आल्या. यातील एका खोलीत सर्वत्र रक्ताचा सडा पडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या बाबत स्थानिक पोलिसांना माहिती विचारली असता एखाद्या जखमी श्वानाचं हे रक्त असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. मात्र अद्यापही या प्रकरणावर ठोस पुरावा हाती लागला नसून पोलिसांचा तपास सुरु आहे. कळंबोली वसाहतीमधील सेक्टर 3 येथे सिडकोच्या माध्यमातून उद्यान विकसित करण्यात आले आहे.बाबा गार्डन परिसरात पालिकेच्या मध्यमातून विविध कार्यक्रमांसाठी स्टेज तसेच काही खोल्यांचं बांधकाम करण्यात आलं आहे. शिक्षकी पेशाला कलंक; शिक्षकाकडून तीन विद्यार्थ्यांनीचा लैंगिक छळ, अंबरनाथमधील धक्कादायक प्रकार बांधकाम पूर्ण झाल्यावर या खोल्या कुलूपबंद करणे अपेक्षित होते. मात्र तसे न झाल्याने गदूर्ले आणि मद्यपान करणारे या खोल्यांचा वापर करत असल्याची माहिती परिसरातील नागरिकांनी दिली आहे.त्यातच काही नागरिकांना अशाच एका खोलीत रक्ताचा सडा दिसून आला. खोलीत सर्वत्र पडलेल्या या सड्या बाबत स्थानिक पोलिसठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश थिटे यांना माहिती मिळाली असता कळंबोली पोलिस ठाण्यातील काही कर्मचाऱ्यांनी संबंधित ठिकाणी जाऊन पाहणी केली या वेळी चौकशी केली असता परिसरात मोठ्या प्रमाणात भटक्या श्वानांचा वावर असल्याची माहिती मिळाल्याने अशाच एखाद्या जखमी श्वनाचे हे रक्त असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. मात्र या सगळ्या प्रकरणामुळे आता स्थानिकांमध्ये भितीचं वातावरण पाहायला मिळत आहे.

# कल्याणमध्ये रेल्वेत नोकरीच्या आमिषाने बेरोजगारांची ७४ लाखांची फसवणूक



**कल्याण :** रेल्वेमध्ये नोकरीला लावतो, असे सांगून येथील एका कुटुंबातील सदस्य, संशयास्पद रेल्वे अधिकाऱ्यांनी संगनमत करून रायगड जिल्ह्यातील रोहा येथील एक रहिवासी आणि इतर बेरोजगार तरूणांची एकूण सुमारे ७४ लाख ४० हजार रूपयांची फसवणूक केल्याची तक्रार महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रारदाराकडून दाखल करण्यात आली आहे. जानेवारी ते मे या कालावधीत हा फसवणुकीचा प्रकार घडला आहे. फसवणूक झालेल्या रोहा येथील एका व्यक्तिने याप्रकरणी महात्मा फुले पोलीस ठाण्यात गुरुवारी तक्रार केली. पोलिसांनी प्राथमिक तपासणी अहवाल नोंदवून घेतला आहे.

तक्रारदाराने पोलीस ठाण्यातील तक्रारीत चिकणघर भागातील एका कुटुंबातील चार सदस्य, संशयास्पद तीन रेल्वे अधिकारी आणि एक वैद्यकीय अधिकारी या संशयितांविरुध्द तक्रार दाखल केली आहे. पोलीस ठाण्यातील तक्रारीतील माहिती, अशी, तक्रारदाराचा मुलगा बेरोजगार असल्याने त्यांना नोकरीची गरज होती. तक्रारदाराची ओळख गुन्हा दाखल संशयास्पद व्यक्तिंबरोबर झाली. या नऊ व्यक्तिंमधील काही जण हे रेल्वे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी असल्याचे तक्रारदाराला भासविण्यात आले.

गुन्हा दाखल संशयित व्यक्तिंनी तक्रारदाराला रेल्वेत आमची ओळख असुन आम्ही रेल्वेते विविध पदावर आम्ही नोकरी मिळवून देऊ शकतो असे आमिष तक्रारदाराला दाखविले. आता रेल्वे भरती प्रक्रिया सुरू आहे असे सांगितले. या आमिषाला बळी पडून तक्रारदाराने आपल्या मुलासाठी आणि इतर बेरोजगार तरूणांनी रेल्वेत नोकरी मिळते या अपेक्षेने गुन्हा दाखल व्यक्तिंच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. गुन्हा दाखल कुटुंबीयांमधील एका सदस्याने कथित रेल्वे अधिका[]यांची तक्रारदाराची भेट घालून दिली. तक्रारदार आणि इतर बेरोजगार तरुणांकडून गुन्हा दाखल व्यक्तिंनी नोकरी लावण्याच्या बदल्यात ७४ लाख ४० हजार रुपए विविध बँक खात्यावर जमा करून घेतले. तक्रारदारासह बेरोजगार तरूणांना नोकरी लावण्याचे बनावट ईमेल, नियुक्ती पत्रे संशयास्पद रेल्वे अधिकाऱ्यांनी पाठविली.

आपणास मिळालेली नियुक्ती पत्रे बनावट असल्याचे समजल्यावर तक्रारदारसह तरूणांनी पैसे परत मिळण्यासाठी गुन्हा दाखल व्यक्तिंकडे तगादा लावला. त्यांच्याकडून पैसे परत मिळण्याची शक्यता नसल्याने आपली फसवणूक झाली म्हणून तक्रारदाराने महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे यांनी सांगितले, याप्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला आहे. अद्याप कोणाला अटक केलेली नाही.

# टिटवाळ्यात भटक्या श्वानांच्या हल्ल्यात महिला गंभीर जखमी



**कल्याण :** टिटवाळा येथे एका गृहसंकुलाच्या परिसरात शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास भटक्या श्वानांनी केलेल्या हल्ल्यात एक साठ वषार्ची महिला गंभीर जखमी झाली. या महिलेची प्रकृती चिंताजनक झाल्याने तिला मुंबईतील जे. जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या महिलेची ओळख पटलेली नाही. ही महिला भिक्षेकरी किंवा कचरा वेचक असण्याची शक्यता प्रत्यक्षदर्शींकडून व्यक्त केली जात आहे. टिटवाळ्यातील रिजन्सी सर्वम गृहसंकुलाच्या मागील बाजुस शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास ६० वषार्ची एक महिला पायी चालली होती. या महिलेला पाहून या भागातील चार भटके श्वान तिच्या अंगावर धाऊन आले. चारही श्वानांनी एकावेळी या महिलेवर हल्ला केल्याने महिला जमिनीवर कोसळली. भटक्या श्वानांनी महिलेचे कपडे, तिच्या शरीराला चावे घेऊन तिला घायाळ केले. या महिलेने सुरूवातीला भटक्या श्वानांच्या तावडीतून सुटण्यासाठी प्रयत्न केले. एकचवेळी चारही श्वान आक्रमकपणे महिलेवर हल्ला करत असल्याने तिला उठणे शक्य झाले नाही. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेली महिला घटनास्थळीच बेशुध्द झाली. भटक्या श्वानांनी या महिलेला ओढत गृहसंकुलाच्या दिशेने नेले. महिलेची श्वानांशी प्रतिकार करण्याची शक्यती संपल्याने ती निपचित पडून होती. परिसरातील काही रहिवाशांना, गृहसंकुलाच्या रखवालदारांना या घटनेची माहिती मिळताच ते घटनास्थळी धाऊन आले. त्यावेळी श्वानांनी त्या महिलेला सोडून पळ काढला. जागरूक नागरिकांनी तातडीने या महिलेला रुग्णवाहिकेकडून गोवेली येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. या महिलेची प्रकृती चिंताजनक असल्याने तिच्यावर गोवेली रुग्णालयात प्राथमिक उपचार करून उल्हासनगर येथील मध्यवर्ति रुग्णालय, तेथून कळवा येथील शासकीय रूग्णालय येथे पाठविण्यात आले. या महिलेची प्रकृती चिंताजनक झाल्याने तिला मुंबईतील जे. जे. रुग्णालयात अधिकच्या उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.टिटवाळात श्वानांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या महिलेची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांच्यावर गोवेली शासकीय रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना अधिकच्या उपचारासाठी जे. जे. रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. साठ वर्ष वयाच्या या महिलेची ओळख पटलेली नाही. डॉ. दीपलक्ष्मी कांबळे वैद्यकीय अधिकारी, गोवेली शासकीय रुग्णालय. कल्याण.



पोलीस बातमी पत्र
विविध
२
मुंबई, मंगळवार, १० डिसेंबर ते १६ डिसेंबर २०२४

## बालकांवर टीव्हीचा परिणाम



आजकाल लहान मुलांमध्ये टीव्ही पाहण्याचे फॅड दिवसेंदिवस वाढत आहे. मुलांमध्ये वाढत असलेले हे टीव्ही प्रेम त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने कितपत हानीकारक आहे, याचा विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. जी मुले तासन् तास टीव्हीसमोर बसून सतत कार्यक्रम बघत असतात, त्यांना डोकेदुखी, डोळ्यांना थकवा यासारख्या तक्रारी सतत भेडसावत असतात. आजकालची मनोरंजनाची दुनिया इतकी व्हास्ट झाली आहे की, मुले टीव्हीला आणि कॉम्प्युटरला सतत चिकटलेली असतात. सदैव मनोरंजनाच्या जगतात वावरत असतात. या कारणामुळे त्यांच्याजवळ खेळण्या-बागडण्यासही उसंत नसते. परिणामी त्यांची शारीरिक हालचाल दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. त्यांच्या शरीराला व्यायाम मिळत नाही. व्यायामाअभावी त्यांच्यात अनेक व्याधी उत्पन्न होत आहेत.

# शॉपिंग करताना हे लक्षात ठेवा!

**सणासुदीला बाजारात अतिशय उत्साहाचे वातावरण असते. करोडो रुपयांची उलाढाल होते, परंतु अशावेळी आंधळेपणाने खरेदी केल्यामुळे फसगत होण्याची शक्यता असते. हे टाळावे म्हणून खरेदीला निघण्यापूर्वी पुढील गोष्टी जाणून घेणे आवश्यक आहे. १९८६ च्या ग्राहक संरक्षण कायद्याने ग्राहकाला पुढील सहा महत्त्वपूर्ण अधिकार मिळालेले आहेत. सुरक्षेचा हक्क, माहितीचा हक्क, वस्तू किंवा सेवा आपल्या इच्छेप्रमाणे निवडण्याचा हक्क, ग्राहकाचे म्हणणे ऐकले जाण्याचा हक्क, तक्रार निवारणाचा हक्क, ग्राहक म्हणून जबाबदारी व कर्तव्ये पार पाडण्यासाठी ग्राहक शिक्षण मिळवण्याचा हक्क. या हक्कांच्या आधारे आज सर्वसामान्य ग्राहक पुढील प्रकारच्या व्यवहारात तक्रार दाखल करून न्याय मिळवू शकतो.**

▮खरेदी केलेल्या किंवा खरेदीच्या कराराने घेतलेल्या वस्तूंमध्ये दोष आढळणे.

▮भाड्याने किंवा भाड्याच्या कराराने घेतलेल्या सेवांबाबत त्रुटी किंवा उणिवा असणे.

▮अनुचित व्यापारी प्रथेने केलेले व्यवहार.

▮छापील किमतीपेक्षा अधिक किंमत आकरली जाणे.

▮ग्राहकाच्या जीवाला किंवा सरुक्षिततेला धोका निर्माण होईल अशा वस्तूंची विक्री.

▮वरील हक्क आणि हक्कांची व्यापकता लक्षात घेऊन उपरोक्त प्रकारच्या तक्रारी बँका सेवा, आर्थिक सेवा, प्रवास, वीजपुरवठा, खाणावळी, हॉटेल्स, करमणुकीची साधने, माहिती प्रसारण, गृहनिर्माण, वैद्यकीय सेवा, शिक्षण तसेच टेलिफोन, रेल्वे, विमान सेवा, बस सेवा आदी सार्वजनिक सेवांच्या संदर्भात आढळून आल्यास ग्राहक याबाबतीत तक्रार करून अन्यायाचे निवारण करू शकतो.

▮ग्राहकांना हक्क प्राप्त झाले आहेत, परंतु त्यांची जपवणूक करण्यासाठी व ते बजावण्यासाठी ग्राहकांनी काही कर्तव्ये पार पाडायला हवीत.

▮ केवळ आकर्षक जाहिरातीला भुलून खरेदीला उद्युक्त होऊ नका. आपल्याला हव्या असलेल्या वस्तूची प्रथम आपल्याला गरज आहे किंवा नाही हे निश्चित करा. गरज नसताना खरेदी करणे टाळा.

▮रोजची औषधे खरेदी करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घेणे केव्हाही हितावह असते.

▮खाद्यपदार्थ किंवा वाण सामान घेताना त्यात काही भेसळ नाही, याची खात्री करून घ्यावी.

▮भेसळ कशी ओळखायची याची माहिती करून घ्यावी.

▮हल्ली शेव, चिवडा, वेफर्स, पापड इत्यादी वस्तू दुकानात उपलब्ध असतात. त्यांच्या उत्पादकांनी त्यात वापले जाणारे जिन्नस, त्या बनवण्याचे ठिकाण आदींची माहिती त्यांच्या वेष्टनावर नियमानुसार दर्शवलेली नसते.



## छातीतील जळजळीमुळे त्रस्त आहात? मग हे करून बघा


**छातीत जळजळ होणे ही एक सामान्य बाब आहे. जी प्रत्येकास होते. वास्तविक, ज्या वेळी लोकं जास्त चमचमीत आणि तळकट खातात त्यावेळी त्यांना हा त्रास होतो. याव्यतिरिक्त पोटात आम्ल तयार झाल्यावर देखील छातीत जळजळचा त्रास होतो. कधी-कधी असेही आढळून येतं की विशेष अन्न खाल्ल्यावर किंवा रात्रीच्या वेळी छातीत जळजळ होण्याची वेदना होते. कधी कधी असे ही होतं की झोपल्यावर, वाकल्यावर, दुखणं वाढतं. यामुळे माणूस काही ही करू शकतं नाही. त्याला कुठेदेखील बसता येतं नाही. यावर घरगुती उपाय जाणून घ्या...**

**छातीत जळजळ होण्याचा त्रासांमध्ये फायदेशीर आहे आलं :** आलं औषधीगुणांनी समृद्ध मानली जाते. छातीच्या जळजळच्या त्रासासाठी देखील हा प्रभावी उपाय आहे. कधी ही जेवण केल्यानंतर आपल्या छातीत जळजळ होतं असल्यास, आलं चावून चावून खावं किंवा आल्याचा चहा देखील बनवून पिऊ शकता. या मुळे आराम मिळेल.

**थंड दूध देखील जळजळ कमी करतं :** दूध तर शरीरासाठी फायदेशीर मानलं जातं, हे छातीची जळजळ कमी करण्यासाठी देखील प्रभावी उपाय आहे. यासाठी आपण एक ग्लास थंड दुधाचं सेवन करावं किंवा त्यामध्ये एक चमचा मध मिसळून देखील पिऊ शकता. यामुळे छातीत जळजळ होण्याच्या समस्येपासून बराच आराम मिळेल.

**आवळा देखील जळजळमध्ये आराम देतो :** आवळ्याचं सेवन केल्यानं आपण बऱ्याच आजारापासून वाचू शकता. छातीतल्या जळजळला दूर करण्यासाठीच्या उपायांमध्ये हे एक प्रभावी उपाय आहे. यासाठी आपण कच्चा आवळा देखील खाऊ शकता. किंवा आपण अर्धा चमचा आवळ्याची भुकटी करून त्याला एक ग्लास पाण्यासह घेणं अधिक सोयीस्कर आहे. हे आपल्या छातीच्या जळजळीला त्वरा शांत करतं.

**छातीच्या जळजळीत केळ देखील फायदेशीर आहे :** केळ हे अतिशय फायदेशीर फळ आहे, ज्यामुळे छातीत जळजळ शांत करण्यास मदत करतं. म्हणून जर का आपल्याला छातीत जळजळ होण्याचा त्रास होतं असल्यास त्वरित केळ खा. यामुळे आपल्या छातीतली जळजळ देखील शांत होईल आणि आपल्याला आराम मिळेल.



**टीप :** हा लेख निव्वळ आपल्या माहितीसाठी देत आहोत, आपल्याला काहीही आजार असल्यास किंवा ह्याचे सेवन करण्यापूर्वी त्वरित डॉक्टरांचा सल्ला अवश्य घ्यावा.

## पिंपळाची पानं 'या' आजारांवर ठरतील गुणकारी
# जाणून घ्या आरोग्यदायी फायदे

**अगदी कोठेही सहजासहजी उगवणारे पिंपळाचे झाड सर्वांनाचं माहीत असेल. परंतु त्यांच्या पानाचा आपल्या आरोग्यासाठी फायदा होतो, हे फार कमी लोकांना माहित असेल. पौराणिक कथांमध्ये पिंपळाच्या झाडाची पूजाही करण्यात आलेली आहे. आजही अनेक लोक पिंपळाच्या झाडाला पूजतात. पिंपळाचं झाड तुम्हाला दिवसातील २४ तास ऑक्सिजनचा पुरवठा करून देतं. याच्या पानांचा आपल्याला मोठा फायदा होतो. आज आपण या लेखामधून पिंपळाच्या पानाचे आरोग्यदायी फायदे जाणून घेणार आहोत..**

अनेक जुन्या पुराण्या आयुर्वेदिक ग्रंथामध्ये पिंपळाचं झाड आणि त्याच्या पानाबद्दल अनेक गुण सांगण्यात आले आहेत. पिंपळाच्या पानाचा रस चेहऱ्यावरील रंगामध्ये उजळपणा निर्माण करतो. तसेच तुमच्या शरीरावर एखादी जखम बरी करण्यासाठी आणि सूज कमी करण्यासाठी पिंपळाचे पान गुणकारी ठरते. पिंपळाच्या पानामुळे तुमचा सेक्शुअर स्टॅमिना वाढवण्यासही मदत होते. तसेच गर्भधारणेसाठीदेखील याचा मोठा फायदा होतो. पिंपळाच्या पानामुळे रक्त शुद्ध होण्यास मदत होते. पिंपळाचे मूळं, सालं, पानं आणि फळं या सर्वांचा तुमच्या आरोग्यासाठी उपयोग होतो.

**तापेवर उत्तम उपाय :** तापावर औषध म्हणून पिंपळाचा मोठा फायदा होतो. यासाठी १०-२० पिंपळाची पानं घेऊन पाण्यात उकळवा. हा काढा गाळून प्यायल्याने ताप कमी होतो.

**जुलाब :** तुम्हाला जुलाबाचा त्रास होत असल्यास पिंपळाची पाने, धणे, खडीसाखर याचा समसमान भाग एकत्र करून घ्या. रोज सकाळ संध्याकाळ साधारण ३-४ ग्रॅम या मिश्रणाचे सेवन करा. तुम्हाला नक्की फरक जाणवेल.

**पोटदुखी :** पोटदुखीवर पिंपळाच्या पानाचा काढा रामबाण उपाय ठरू शकतो. त्यासाठी पिंपळाची पानं घेऊन त्याचा काढा तयार करा. हा काढा पिऊन तुमचं पोट साफ होतं. त्यामुळे बद्धकोष्ठतेची समस्यादेखील दूर होते. तसेच पिंपळाची पानं चाऊन खाल्ली तरीहीदेखील पोटदुखीच्या समस्यापासून आराम मिळतो.

**क्षयरोग :** क्षयरोगावरील रामबाण उपाय म्हणजे पिंपळाचं मुळ. पिंपळाचे मुळ बारीक करून त्याचे रोज सेवन केल्यास, क्षयरोगाचा धोका कमी होतो.

**रक्तविकार रोखण्यास मदत :** रक्तविकारांवरील आजारांवर पिंपळाच्या सालांचा काढा गुणकारी ठरतो. यासाठी पिंपळाच्या काढ्यामध्ये ५ ग्रॅम मध मिसळा. या मिश्रणाचे सेवन करा. असे केल्यास तुमची रक्तविकारापासून सुटका होईल.



**खोकला :** पिंपळाची पानं दुधामध्ये उकळून त्यामध्ये साखर घाला. हे मिश्रण दिवसातून दोन वेळा सकाळी आणि संध्याकाळी प्या. असे केल्यास तुम्हाला सर्दी आणि खोकल्यापासून आराम मिळेल.

**हृदयरोगावर गुणकारी :** हृदरोगापासून स्वतःचे संरक्षण करायचे असेल तर पिंपळाची १५ ते २० पानं घेऊन एक ग्लास पाण्यात उकळून घ्या. हे पाणी थंड करून गाळून घ्या. हा काढा दर ३ तासांने दिवसभर प्या. हा उपाय केल्याने तुमचे हृदयरोगापासून संरक्षण होते.

## पुदिन्याचा चहा घ्या आणि वाढवा स्मरणशक्ती

**तुम्ही** जर कोणत्या गोष्टी पटकन विसरत असाल किंवा कोणत्या गोष्टी लक्षात ठेवायला त्रास होत असेल तर पुदिनाची चहा प्या. कारण एका संशोधनातून हे समोर आलयं की पुदिनाची चहा प्यायल्याने माणसाचं आयुष्य निरोगी आणि उत्साही राहते. शिवाय स्मरणशक्तीत सुधारणा देखील होऊ शकते. हे संशोधन करण्यासाठी १८० जणांचा अभ्यास करण्यात आला. त्यांना पुदिन्याची चहा, कॅमोमिल चहा, गरम पाणी असे काही दिवस पिण्यास सांगितले. संशोधनाच्या परिणांमानुसार, कॅमोमिल आणि गरम पाणी पिणाऱ्यांच्या तुलनेत पुदीन्याची चहा पिणाऱ्या लोकांच्या स्मरणशक्तीत महत्त्वपूर्ण सुधारणा झाली. कॅमोमिल चहा पिणाऱ्यांमध्ये एकाग्रता क्षमता कमी वाटली. हे संशोधन आताचं लंडनमध्ये आयोजित केलेल्या मानसिक सोसायटीच्या वार्षिक परिषदेत दाखवण्यात आले.



# 'हे' आहेत उटणे लावण्याचे फायदे

**◆ त्वचा मुलायम होण्यासाठी**

दिवाळी हा थंडीच्या दिवसांत येणारा सण. थंडीमुळे शरीराची त्वचा कोरडी होते. अनेकदा अशा कोरड्या त्वचेमुळे आगही होते. या समस्येपासून सुटका व्हावी यासाठी पूर्वीपासून उटण्याचा वापर केला जातो. उटण्यामधील आयुर्वेदिक घटकांमुळे त्वचेचा कोरडेपणा कमी होऊन ती मुलायम होण्यास सुरुवात होते. उटण्यामध्ये असणारी चंदन पावडर आणि हळद यामुळे त्वचा उजळण्यास मदत होते. त्यामुळे दिवाळीशिवायही एरवी आणि विशेषतः थंडीच्या दिवसात आठवड्यातून एकदा उटण्याचा वापर जरुर करावा.

**◆ नैसर्गिकरीत्या चमक देते**

उटण्यामध्ये रक्तचंदन, वाळा, चंदन, वेखंड, कात, नागरमोथा यांसारख्या वनस्पती आणि खोडांचा वापर केला जातो. हे घटक त्वचेला स्क्रबर म्हणून काम करतात. यामुळे काळवंडलेली त्वचा उजळण्यास मदत होते. याशिवाय उटण्याच्याबरोबरीने बेसन पीठही लावल्यास ते फायद्याचे ठरते. चंदनामुळे शरीराला थंडावा मिळतो

**◆ सुरकुत्या टाळणे शक्य**

वयानुसार त्वचेला सुरकुत्या पडण्याचे प्रमाण उटण्यामुळे कमी होते. हळदीमध्ये ॲन्टीएजिंग घटक असल्याने त्याचा त्वचेला फायदा होतो. त्वचा दीर्घकाळ तजेलदार आणि टवटवीत दिसते. याशिवाय उटण्यात मध किंवा दूध टाकल्यास त्याचा जास्त फायदा होतो. मध मिसळल्यास त्वचा मुलायम होण्यास मदत होते.

**◆ चेहऱ्यावरील अनावश्यक केसांची वाढ रोखण्यास उपयुक्त**

चेहऱ्यावरील किंवा हाता-पायावरील केस जास्त वाढू नयेत यासाठी लहानपणी बाळाला अंघोळ घालताना मसूर डाळीचे पीठ किंवा हरभरा डाळीचे पीठ लावले जाते. मात्र तरीही केस कमी न झाल्यास उटणे हा अतिशय उत्तम पर्याय असतो. उटणे लावून ते गोलाकार फिरवल्यास त्याचा केसांची वाढ थांबण्यासाठी उपयोग होतो. मात्र अशाप्रकारे उटणे चोळताना त्याचा त्वचेवर वाईट परिणाम होणार नाही याची काळजी घ्यायला हवी.



# मावा करंजी

साहित्य- १ कप मैदा, १ कप साजूक तूप, १/२ कप रवा, १/४ ग्लास पाणी, १ कप पिठी साखर, १ कप भाजलेला खवा, १ कप बारीक सुकलेलं खोबरं, बदाम आणि पिस्त्याचे काप, १ चमचा चारोळ्या, केशर आणि चिमूटभर वेलची पूड.

कृती - एका पॅनमध्ये एक चमचा साजूक तूप गरम करण्यासाठी ठेवा. तूप गरम झाल्यावर त्यात अर्धा कप रवा भाजून घाला. यामध्ये सुकं खोबरं, चारोळी, बदाम, पिस्त्याचे काप, वेलची पूड, केशर सर्व जिन्नस घाला. पॅनमधले सारण थंड झाल्यावर यामध्ये पिठी साखर, भाजलेला खवा मिसळा आणि सारण तयार करा. एका भांड्यात मैदा घेऊन त्यामध्ये अर्धा कप तूप मिसळा. यामध्ये थोडं थोडं करून कोमट पाणी घाला आणि पीठ मळून घ्या. थोड्या वेळासाठी हे मळलेले पीठ ओलसर कपड्याने झाकून ठेवा. मळलेलं पीठ एक सारखे करून लहान लहान गोळ्या बनवा आणि त्याचा लहान पुरीसारखे लाटून त्या पारीमध्ये सारण भरून त्याच्या कडेला दुधाचा हात लावून करंजीच्या साच्यामध्ये ठेवून करंज्या करा. आता एका कढईत तूप टाकून गरम करण्यासाठी ठेवा. आता या करंज्या तुपात टाकून तळून घ्या.




**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**उत्तर कोंकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, कळवा, ठाणे**
**रायगड पाटबंधारे विभाग क्र. २, (बांधकाम), कोंकण भवन, नवी मुंबई**

**दरपत्रक सूचना क्र. ०५ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र. २, (बांधकाम), ब्लॉक क्रमांक ३०२, तिसरा मजला, कोंकण भवन, नवी मुंबई, दूरध्वनी क्रमांक ०२२-२७५७६४३७ हे खालील प्रमाणे दि. १२/१२/२०२४ ते दि. १९/१२/२०२४ या कालावधीतील ठाणे जिल्ह्यातील धसई ल.पा. योजना, ता. मुरबाड जि. ठाणे या धरणांकरीता आपत्कालीन कृती आराखडा तयार करणे या करीता इच्छुक कंत्राटदारांकडून मोहरबंद लखोट्यात दरपत्रके मागवित आहेत. इच्छुक कंत्राटदारांकडून मोहोरबंद लखोटयात आपले कमीत कमी दर नमुद करुन दरपत्रके या कार्यालयास दि. १९/१२/२०२४ पर्यंत ठिक सांय. ०५.०० वाजेपर्यंत पोस्टाने अथवा समक्ष हस्तेपोहोच पोहोचतील अशा बेताने पाठवावीत. तदनंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

| Sr. No. | Particular | Unit | Rate (Per Job) |
|---|---|---|---|
| 1. | Preparation of Emergency Action Plan which includes –<br>a. Collection o DEM for the probable inundation area from reliable sources and conducting Dam break analysis.<br>b. Collecting required Data from I.M.D. and Revenue including necessary fees.<br>c Preparation of inundation mapping as per CWC guidelines with HecRas or similar software with planning of escape routes for all important inundation places.<br>d. Preparing detailed EAP report as per templates given in guidelines of CWC manual.<br>e. Submission of Two copy of preliminary EAP report for checking and Approval of competent authority.<br>f. After approval the preliminary EAP report and after incorporating necessary corrections and suggestions as per the approval copy, ten copies of Final report with a soft copy shall be prepared and submitted to the Engineer in charge. | Per Job | |

**अटी व शर्ती**

१) आपत्कालीन कृती आराखड्याची करण्यात येणारी सर्व कामे ही उत्तम गुणवत्तेसह पुर्ण करण्यात यावी.
२) दिलेले दर हे स्थानिक बाजारभावाशी सुसंगत असावेत.
३) दरपत्रक दि.२०/१२/२०२४ उघडण्यात येतील.
४) दरपत्रके प्राप्त झाल्यानंतर तुलनात्माकदृष्टया कमीत कमी आढळलेल्या दरास वरिष्ठ कार्यालयाकडून मंजूरी प्राप्त झाल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येईल.
५) वरीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झाल्यानंतर एक अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.
६) दरपत्रकाच्या लखोट्यावरती जाहिरात क्रमांकासह ठाणे जिल्ह्यातील धसई ल.पा. योजना, ता. मुरबाड जि. ठाणे या धरणांकरीता आपत्कालीन कृती आराखडा तयार करणे असे स्पष्ट अक्षरात नमुद करण्यात यावे.

सही/-
(स. द. जाधव)
कार्यकारी अभियंता,
रायगड पाटबंधारे विभाग क्र. २, (बां.)
कोंकण भवन, नवी मुंबई

जा.क्र. रापावि२/लेखा-१/२२१०/२०२४
रायगड पाटबंधारे विभाग क्र. २, (बांधकाम), कोंकण भवन,
नवी मुंबई.
दिनांक : ०५/१२/२०२४

क्र. जिमाका/ठाणे/जाहि/2024-25/51

## संपादकीय

# दूरदृष्टीचे राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे विविध उपाधींनी संबोधतात. विश्वरत्न, क्रांतीसूर्यापासून ते ज्ञानाचा महासागर, महासूर्य अशा उपमा देताना शब्दकोशही संपतो. त्यांनी समाजातील उपेक्षितांसाठी केलेला संघर्ष व कार्य अजोड स्वरुपाचे आहे. त्यांचे विविध विषयांवर प्रभुत्व होते. समाजकारण, राजकारण, अर्थकारण, कृषी, कामगार, धर्म, संस्कृती, शिक्षण, उपेक्षितांचे संरक्षण अशा अनेक विषयांवरचा त्यांचा व्यासंग दांडगा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक पैलूवर स्वतंत्र ग्रंथ, खंड होऊ शकतो. हे सगळे खंड आणि ग्रंथ सामान्य वाचकाला पूर्ण वाचता येतीलच असं नाही, म्हणून बाबासाहेबांचं चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व आणि विचारांचे संकलन करून डॉ. मिलिंद रणवीर यांनी 'बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हे पुस्तक लिहिले आहे. त्यातून त्यांनी बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वाचे अनेक पैलू उलगडले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगण्याची ऊर्जा, प्रेरणा आणि श्वाससुद्धा आहेत. जगाच्या इतिहासात अनेक विचारवंत, क्रांतिकारक होऊन गेले, परंतु प्रतिकूल परिस्थितीवर मात करून इतिहासच बदलून नव्याने इतिहास लिहून आधुनिक भारताचा नकाशा जगासमोर आणणाऱ्या प्रकांड पंडिताला अख्ख जग सॅल्यूट करते, असा एकमेव महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर. बाबासाहेबांनी कित्येक आयुष्यांचं काम एकाच आयुष्यात करून ते यशस्वी केलं.

त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक क्रांतीने दलित, उपेक्षित, वंचित, शेतकरी, भटके, कष्टकरी, आदिवासी वर्गाला सन्मान मिळाला. जगभरातील महापुरुष, विचारवंत, राष्ट्रीय नेत्यांपेक्षा बाबासाहेबांचा सन्मान अधिक होतो, ते विद्वान तर होतेच, परंतु मानवमुक्तीचा मार्ग दाखवणारे थोर क्रांतिकारक होते. आजच्या परिस्थितीत त्यांची तुलना कुणाबरोबरही करता येत नाही. भारताच्या विकासाचा कोणताही आधुनिक विचार बाबासाहेबांच्या दृष्टिकोनातून सुटलेला नाही. म्हणूनच ते राष्ट्रनिमार्ते ठरतात.

आताच्या घडीला बाबासाहेबांच्या विचारांचा प्रवाह अधिक जोमाने वाढतो आहे. जगभरात सर्वाधिक पुतळे बाबासाहेबांचेच असून त्यांची जयंती संपूर्ण जगभर साजरी होते आणि महापरिनिर्वाणदिनाला चैत्यभूमीला विविध जाती, धर्म, पक्ष, संस्था, संघटना आणि अनुयायी अभिवादन करण्यासाठी येतात, हा एकमेव विश्वविक्रम आहे. बाबासाहेबांना त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे विविध उपाधींनी संबोधतात. विश्वरत्न, क्रांतीसूर्यापासून ते ज्ञानाचा महासागर, महासूर्य अशा उपमा देताना शब्दकोशही संपतो. त्यांनी समाजातील उपेक्षितांसाठी केलेला संघर्ष व कार्य अजोड स्वरुपाचे आहे.

त्यांचे विविध विषयांवर प्रभुत्व होते. समाजकारण, राजकारण, अर्थकारण, कृषी, कामगार, धर्म, संस्कृती, शिक्षण, उपेक्षितांचे संरक्षण, सार्वभौमत्व, कायदा, संविधान, विकास, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, संघटन, संघर्ष, भौतिक सुविधा या विषयांवरचा त्यांचा व्यासंग दांडगा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक पैलूंवर स्वतंत्र ग्रंथ, खंड होऊ शकतात. हे सगळे खंड आणि ग्रंथ सामान्य वाचकाला पूर्ण वाचता येतीलच असं नाही म्हणून बाबासाहेबांचं चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व आणि विचारांचे संकलन करून डॉ. मिलिंद रणवीर यांनी 'बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हे पुस्तक लिहिले आहे.

डॉ. मिलिंद रणवीर व्यवसायाने पाळीव प्राण्यांचे डॉक्टर. आंबेडकरी विचारधारेने झपाटलेले कार्यकर्ते, त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल त्यांना अनेक सन्मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. 'बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या पुस्तकात बाबासाहेबांचे विविध पैलू, शैक्षणिक, मानद पदव्या, देशातील व जगातील लोकांनी त्यांच्यात असलेल्या गुणांबद्दल, देशसेवेबद्दल त्यांनी व्यक्त केलेले विचार, त्यांनी केलेली आंदोलने, ब्रिटिशांच्या भूमीत त्यांच्याच खर्चाने जाऊन संपूर्ण स्वातंत्र्यांची मागणी करणे, सामाजिक स्तरावरती मजूर व शेतकऱ्यांसाठी केलेल्या सुधारणा, सार्वभौमिक राष्ट्रनिर्मिती, देशाला एकत्रित बांधून ठेवणारे संविधान, देशाला महासत्ताक व विकसित राष्ट्र बनविण्यासाठी त्यांनी केलेल्या भौतिक सुधारणा आणि त्यांचे जीवन, विचार, कार्य, बौद्धधम्माची स्वीकृती, त्याचबरोबर कामगार कल्याण, सामाजिक चळवळीचे पुरस्कर्ते, स्त्री-पुरुष समान मजुरीचे पुरस्कर्ते, ग्रंथप्रेमी, पत्रकार, परखड व बुद्धिवादी, धर्म आणि धम्म यांचे चिकित्सक, परिवर्तनाची चळवळ स्थापन करणारे, तसेच द प्रॉब्लेम ऑफ रुपी ग्रंथावर आधारित रिझर्व्ह बँकेची स्थापना, बुद्ध धम्म हाच जीवनमार्ग मानणारे बाबासाहेब अशा १४९ मुद्यांचे लेखकाने अभ्यासपूर्ण संकलन केले असून त्यासंबंधातील संक्षिप्त परंतु महत्त्वाची माहिती या पुस्तकात समाविष्ट केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या मूलभूत हक्कांसाठी चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, काळाराम मंदिर, अंबाबाई मंदिर सत्याग्रह असे लढे दिले. वंचित समाजाच्या जीवनात मोठे परिवर्तन करून सामाजिक क्रांतीचा आविष्कार घडविला. म्हणून त्यांना जगातील समतेचे महान क्रांतिकारक, तत्त्वज्ञ म्हणून ओळखले जाते. बाबासाहेबांनी जगातील सर्वात मोठे लोकशाहीवादी संविधान लिहून भारत हे सार्वभौमवादी राष्ट्र निर्माण केले.

व्हॉईसरॉयच्या मंत्रिमंडळात पाच खात्यांच्या मंत्रिपदाचा कार्यभार सांभाळून भारतात मूलभूत सुविधा निर्माण करून दिल्या.



मजुरांसाठी किमान निर्धारित वेतन, स्त्रियांसाठी हिंदू कोड बिल, शेतकऱ्यांच्या हितासाठी सावकारी पद्धत नष्ट करणे, बेरोजगारांसाठी सेवायोजन या सर्व संकल्पनातून भारताला सर्वश्रेष्ठ बनविण्याचे महान कार्य बाबासाहेबांनी केले आहे. त्याचबरोबर जलनियोजन, विद्युत, ऊर्जा, सार्वजनिक बांधकाम, खनिज निर्मिती या विभागांचा कार्यभार सांभाळला. भारताला शेती व औद्योगिकीकरणासाठी पायाभूत संरचना निर्माण करून दिली.

या कार्यपद्धतीला आजही तोड नाही. याचाही थोडक्यात परिचय या पुस्तकात आहे. लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते आचार्य प्र.के.अत्रे यांनी डॉ. आंबेडकरांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त ह्यनवयुगह्लचा खास विशेषांक काढायचे ठरविले. त्यानिमित्ताने खास मुलाखत घेण्यात येणार होती. तेव्हा बाबासाहेब म्हणतात, मी लोकशाहीचा कट्टर पुरस्कर्ता आहे. मला विभूतीपूजा कशी आवडेल? विभूतीपूजा हा लोकशाहीचा विपऱ्यास आहे. पुढारी लायक असेल तर त्याच्याबद्दल प्रेम बाळगावे, आदर राखावा, पण पुढाऱ्यांची देवाप्रमाणे पूजा कसली करता? त्यामुळे पुढाऱ्यांबरोबर भक्तांचाही अधःपात होतो.


आताच्या परिस्थितीमध्ये बाबासाहेबांचे विचार महत्त्वाचे असून सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पुर्ढायांना ही चपराकच आहे. बाबासाहेब तत्त्वाला जागणारे, नीतीमत्ता पालन करणारे आणि शील जपणारे होते. बाबासाहेब म्हणतात, मी माज्या जीवनात जाणीवपूर्वक कधीही शीलाचा भंग केला नाही. मी अमेरिकेत लंडनमध्ये असतानासुद्धा सिगारेट किंवा दारूला स्पर्श केला नाही. ५ जून १९५२ ला कोलंबिया विद्यापीठाने बाबासाहेबांना भारतीय संविधान निर्मितीबद्दल एल.एल.डी.ची पदवी प्रदान केली. त्यांना व्हाईट हाऊसवर जेवणासाठी आमंत्रित केले होते.

त्या ठिकाणी प्रचलित पद्धतीप्रमाणे दारू, सिगारेट ओढणे अगत्याचे असते. शील भ्रष्ट होऊ नये म्हणून बाबासाहेब व्हाईट हाऊसला गेले नाहीत. बाबासाहेब एवढे दक्ष होते की, एके ठिकाणी भाषणात म्हणतात की, काँग्रेस नेते व इतर राजकीय पुढारी माज्याकडे असलेल्या शीलाला आणि तत्त्वांना घाबरतात. बाबासाहेबांच्या अनुयायांना मात्र याचा विसर पडला आहे, यांचं आश्चर्य वाटतं. सत्ता संपत्तीसाठी तत्वाला मूठमाती देऊन शीलभ्रष्ट, नीतीभ्रष्ट लोकांची संख्या वाढताना दिसत आहे, मग प्रश्न पडतो की आपण कोणता बुद्ध आणि बाबासाहेब स्वीकारले?

दिवसातील १८ ते २१ तास अभ्यास आणि काम करणारे बाबासाहेब स्वयंप्रज्ञ होते. त्यांच्या विद्वत्तेपुढे सर्वच नतमस्तक होतात. बाबासाहेब आंबेडकरांचा त्यांच्या प्रत्येक कृतीवर प्रचंड विश्वास होता. त्यांचा कोणताही मुद्दा सहजासहजी कुणालाही खोडता येत नव्हता. लंडनमध्ये पदवीसाठी केलेल्या संघर्षावरून ते सिद्ध होतं. लंडन विश्वविद्यालयात 'रुपयाचा प्रश्न' हा शोधप्रबंध लिहून सादर केला आणि पुढील शिक्षणासाठी ते बॉन (जर्मनी) येथे गेले. लंडन विश्वविद्यालयातील सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रोफेसर कॅननने बाबासाहेबांना लंडनला बोलावून प्रबंधातील काही आक्षेपार्ह भाग वगळण्यास सांगितले, परंतु बाबासाहेबांनी दृढविश्वासाने विचारले, तुम्हाला कोणता भाग अशास्त्रीय वाटतो तो मी काढून टाकीन, परंतु तुम्ही म्हणाल की, हा सर्व प्रबंध तुमच्या विचारांसारखा असावा तर त्यासाठी मी अजिबात तयार होणार नाही. मग तुम्ही मला डॉक्टरेट नाही दिली तरी चालेल. बाबासाहेबांचे बोलणे ऐकून समिती चकीत झाली. प्रो. हॅननने मध्यस्थी करून थोडासा बदल करून प्रबंध स्वीकृत केला व डॉक्टर ऑफ सायन्सचीही पदवी त्यांना बहाल केली. बाबासाहेबांच्या विद्वत्तेपुढे अनेकदा विरोधक चकीत व्हायचे.

१७ डिसेंबर १९४६ रोजी जवाहरलाल नेहरूंनी मांडलेल्या उद्देश व प्रस्तावावर बाबासाहेबांचे पहिले भाषण झाले. त्यांचे कायद्याबद्दलचे ज्ञान आणि विश्लेषण करण्याची तर्कसंगत पद्धती, देशाबद्दलचे प्रेम, संविधानाबद्दलचे प्रगाढ ज्ञान यामुळे संविधान सभा भारावून गेली. भाषण सुरू असताना विरोधक असलेल्या काँग्रेस सदस्यांनी बाके वाजवून साथ दिली व त्यांची स्तुती करून अभिनंदन केले. यावरून विरोधक असले तरी आजच्यासारख्या केवळ टीका टिप्पणी करण्यात त्यावेळचे विरोधक वेळेचा अपव्य करत नव्हते हे सिद्ध होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंसदर्भातील माहिती याआधी आपल्या वाचनात आली असेल, परंतु या पुस्तकात ती संकलित स्वरूपात एकत्रित वाचायला मिळते, हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचा शोध घेऊ पाहणाऱ्या अभ्यासकांसाठीही हे पुस्तक दस्ताऐवज ठरेल. सद्धम्मकार प्रा. आनंद देवडेकर यांची प्रस्तावना आणि प्रा. शुक्राचार्य गायकवाड यांच्या अभिप्रायाने पुस्तकाची उंची अधिकच वाढली आहे.



# लोकप्रिय कवी भा. रा. तांबे

भास्कर रामचंद्र तांबे हे प्रसिद्ध कवी होते. त्यांचा जन्म २७ ऑक्टोबर १८७३ रोजी मध्य भारतातील मुगावली येथे झाला. त्यांचे शिक्षण झांशी आणि देवास येथे झाले. ते १८९३ मध्ये प्रवेशपरीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले, परंतु आर्थिक प्रतिकूलतेमुळे त्यांना उच्च शिक्षण घेता आले नाही. मध्य भारतातच वेगवेगळ्या ठिकाणी युवराजशिक्षक, दिवाण, पोलीस-सुपरिटेंडंट, सरकारी वकील, न्यायाधीश, शिक्षणखात्यात परीक्षा विभागाचे रजिस्ट्रार इत्यादी नोकऱ्यांमध्ये जीवन व्यतीत झाले. ते १९३७ मध्ये ग्वाल्हेर संस्थानाचे राजकवी झाले.

काव्यास विशेष अनुकूल नसणाऱ्या व्यवसायातही तांबे यांचा काव्यलेखनाचा छंद कायम राहिला. इंग्रजी स्वच्छंदतावादी संप्रदायाचे कवी, टेनिसन-ब्राउनिंग, जयदेव हे संस्कृत कवी तसेच रवींद्रनाथ टागोर यांच्या काव्याचे संस्कार त्यांच्यावर वेळोवेळी होत गेले. परंतु त्यांच्या कवितेचे मुख्य स्वरूप गीतांचे, भावगीतांचे राहिले.ब्राउनिंगच्या नाट्यात्मक एकभाषितांप्रमाणे त्यांनी मराठीमध्ये प्राचुर्याने नाट्यगीते लिहिली. त्यांची कविता प्रथम संग्रहरूपाने १९२० मध्ये रसिकांपुढे आली, नंतर दुसरा भाग १९२७ साली आणि समग्र कविता १९३५ साली प्रकाशित झाली. त्यामध्ये एकूण २२५ कविता आहेत. काही हिंदी कवितांचाही त्यात अंतर्भाव आहे.त्यांच्या ह्यअजुनि लागलेचि दारह्ल, ह्यकशी काळ नागिणीह्ल, ह्यकळा ज्या लागल्या जीवाह्ल, ह्यकुणि कोडे माझे उकलिल काह्ल, ह्यघट तिचा रिकामाह्ल, ह्यघन तमीं शुक्र बघह्ल, ह्यचरणि तुझिया मज देईह्ल, ह्यजन पळभर म्हणतील हाय हायह्ल, ह्यडोळे हे जुलमि गडे, तिनी सांजा सखे मिळाल्याह्ल, ह्यतुज्या गळा माज्या गळाह्ल, इत्यादी कविता प्रसिद्ध आहेत. अशा या लोकप्रिय कवीचे ७ डिसेंबर १९४१ रोजी निधन झाले.

# काळजावरचा दगड!

भाजपने अडीच वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे आणि त्यांच्या समर्थक आमदारांना रॉयल ट्रिटमेंट देऊन आपल्या बाजूला वळवून घेतले आणि महाविकास आघाडीचे सरकार पाडले. त्यानंतर भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार स्थापन करण्याचा दावा करण्यात आला. त्यावेळी मी पुन्हा येईन, असे २०१९ च्या विधानसभा निवडणूक प्रचारात सांगणाया देवेंद्र फडणवीस यांना असे वाटत होते की, महायुतीच्या सरकारमध्ये आपण मुख्यमंत्री होणार आणि आपल्यापेक्षा आमदारांची संख्या कमी असलेले एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारतील. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे सरकार राज्यात अडीच वर्षे होते, त्या कालावधीत त्यांना पेचात पकडून उद्धव ठाकरे यांना पायउतार व्हायला लावण्यासाठी भाजपने प्रचंड मेहनत घेतली. त्याचे म्होरके देवेंद्र फडणवीस होते. अगदी एकनाथ शिंदे यांच्या असंतोषाला खतपाणी घालून त्यांना शिवसेनेतून बाहेरचा रस्ता दाखवून महायुतीचे सरकार स्थापण्याचे सूत्रधार फडणवीस होते. हे नंतर एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केले होते. उद्धव ठाकरे यांच्या बंडामुळे २०१९ साली हातातोंडाशी आलेली भाजपची सत्ता पुन्हा आणणाया फडणवीस यांच्या डोक्यावर मुख्यमंत्रीपदाचा मुकुट ठेवला जाईल, असे एकूणच वातावरण होते. त्यामुळे राज्यातील भाजपच्या नेते आणि कार्यकर्ते यांच्यामध्ये प्रचंड उत्साह संचारला होता. देवेंद्र फडणवीसही मुख्यमंत्रीपदाबद्दल निश्चिंत होते. मोठ्या मेहनतीने भाजपची सत्ता पुन्हा राज्यात आली, त्यामुळे भाजप आणि देवेंद्र फडणवीस अतिशय उत्साहात आणि आनंदात असताना भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडून चक्रे फिरली आणि देवेंद्र फडणवीस यांच्याऐवजी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे देवेंद्र फडणवीस आणि राज्यातील भाजपमध्ये प्रचंड नाराजी पसरली. ती नाराजी देवेंद्र फडणवीस यांच्या चेर्हयामध्ये जो अचानक फरक पडला त्यावरून स्पष्ट दिसत होती. एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री होणार हे निश्चित झाल्यावर सुरुवातीला आपण सरकारच्या बाहेर राहून संघटनेचे काम करू असा विचार मांडून देवेंद्र फडणवीस यांनी आपली नाराजी व्यक्त केली, पण केंद्रीय नेतृत्वाकडून आदेश आल्यानंतर त्यांना सरकारमध्ये सहभागी होऊन उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे लागले होते. खरे तर देवेंद्र फडणवीस हे त्यापूर्वी पाच वर्षे राज्याचे मुख्यमंत्री राहिलेले होते. तसेच भाजपकडे आमदारांची संख्या जास्त होती, तरीही फडणवीस यांना तो कमीपणाचा घास मुकाटपणे गिळावा लागला. त्यांनी एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व मान्य केले आणि अडीच वर्षे त्यांना कुठल्याही प्रकारचा उपद्रव न देता सहकार्य केले. पण आता अडीच वर्षांनंतर २०२४ सालची राज्यात विधानसभा निवडणूक झाली तेव्हा भाजपचे १३२ आमदार निवडून आले. एकनाथ शिंदे यांचे ५७ आमदार निवडून आले. इतकेच नव्हे तर मुख्य शिवसेना आणि त्यांचे धनुष्यबाण हे चिन्ह शिंदे यांच्या नावावर करण्यासाठी जी न्यायालयीन लढाई लढावी लागली त्यात शिंदेंना भाजपने मोठी मदत केलेली आहे, हे काही लपून राहिलेले नाही. कारण शिंदेंना केवळ स्वतःच्या बळावर इतकी उलाढाल करणे शक्य झाले नसते. भाजपने एकनाथ शिंदे यांच्यासाठी इतके सगळे केले त्यामुळे आता तरी शिंदे नव्या सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री बनवण्यास सहज समर्थन देतील, असे भाजपच्या नेत्यांना वाटत होते, पण तसे काही झाले नाही. विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून महायुतीच्या सरकारला सुपर डुपर बहुमत मिळाल्यांनतर दहा दिवस उलटले तरी त्यांनी सरकार स्थापनेचा दावा केला नव्हता, याला एकच प्रमुख कारण होते. ते म्हणजे महायुतीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण हे निश्ितत होत नव्हते. मागील अडीच वर्षात मुख्यमंत्री म्हणून सुस्थापित झालेले एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्रीपद सोडायला तयार नव्हते. त्यातही पुन्हा मुख्यमंत्रीपद सोडले तर त्या बदल्यात गृहमंत्रीपद आपल्याला देण्यात यावे, मुलाला उपमुख्यमंत्रीपद द्यावे, अशा ज्या एकनाथ शिंदे यांच्या मागण्यांची चर्चा होती, ती भाजपला मान्य नव्हती. त्यामुळेच गेले दहा दिवस महायुतीचे घोडे अडले होते. एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले होते की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा जो निर्णय घेतील तो आपल्याला मान्य असेल, पण तसे असते तर सत्तास्थापनेचा दावा करण्यासाठी दहा दिवस घालवण्याची काय गरज होती. महायुतीच्या आमदारांनी बुधवारी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांना भेटून सत्तास्थापनेचा दावा केल्यावर पत्रकार परिषद घेतली. त्यात अजित पवार यांनी जे मार्मिक विधान केले ते बरेच काही सांगून गेले. ते म्हणाले, शिंदेंचे काही माहीत नाही, पण मी उद्या शपथ घेणार. त्यांच्या या विधानातून शिंदेंच्या मनात काय चालू आहे, हे कळू शकते. अडीच वर्षांपूर्वी फडणवीसांना बाजूला सारून जेव्हा एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद देण्यात आले, तेव्हा भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकात पाटील यांनी एकूणच भाजपवाल्यांच्या मनातील भावना व्यक्त करताना म्हटले होते, काळजावर दगड ठेवून आम्हाला मुख्यमंत्रीपद एकनाथ शिंदे यांना द्यावे लागले. शिंदेंना अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद दिल्यावर आता तरी हा काळजावरचा दगड सहज बाजूला करता येईल, असे भाजपवाल्यांना वाटत होते. पण अजूनही शिंदेंच्या नाराजीचे पूर्णपणे निराकरण झालेले दिसत नाही.


## मिरा भाईंदर महानगरपालिका

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**उद्यान विभाग**

२ रा मजला, प्रभाग समिती क्र. ०४, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे - ४०१ १०७, दुरध्वनी - २८१०३४०९.

**जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/७७२/२०२४-२५** **दिनांक : ०५/१२/२०२४**

**// जाहिर नोटीस //**

अमृत योजना हरीत क्षेत्र विकास प्रकल्प सन २०१७-१८ ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान (आरक्षण क्र. २६९) मधील प्रस्तावित मलनिसारण केंद्रा मध्ये बाधित झाडे मुळासहित काढून पुर्नःरोपण करणेकामी दरपत्रक मागविणेकामी चालु जिल्हा दरसुचीमध्ये दर उपलब्ध नसल्यामुळे खुल्या बाजारातुन दरपत्रक मागविण्यात येत आहे.

सदर कामाची दरसुची महानगरपालिकेच्या संकेत स्थळावरुन **www.mbmc.gov.in** Downlod करुन दि. १२/१२/२०२४ रोजी सायं ४.०० वाजेपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका, उद्यान विभाग, २ रा मजला, प्रभाग समिती क्र. ०४, कै. विलासराव देशमुख भवन, जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व) येथे स्वारस्य असलेल्या कंत्राटदाराने सोबत जोडलेल्या दरपत्रकातील बाबींकरीता दर भरुन बंद लिफाफ्यामध्ये देण्यात यावेत.

**जा.क्र. मनपा/मावज/ई- ३४०९८४६/२०२४-२५**
**दि. ०५/१२/२०२४**

**(कल्पिता पिंपळे)**
**उप आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार, १० डिसेंबर ते १६ डिसेंबर २०२४


## सुमारे ३,४९,५३४/- रुतक्रार दाराची फसवणुकी मधील शेअर ट्रेडिंग ची रक्कम पोलिसांनी केली परत

**■मिरारोड :**

Facebook Group वरील Share Trading मध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन तक्रारदार यांची फसवणुक केलेल्या रक्कमेपैकी ३,४९,५३४/- रु तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील मिरारोड पोलीस ठाणेच्या हद्दीत राहणारे तक्रारदार श्री. सुंदर यांनी ऑनलाईन शेअर ट्रेंडिंग करुन अधिक रक्कम मिळत असल्याने ऑनलाईन Share Trading ऍप वर रक्कमेची गुंतवणुक केली. परंतु तक्रारदार यांना कोणताही परतावा मिळाला नाही. त्यावर तक्रारदार यांना आर्थिक फसवणुक झाल्याने सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज सादर केल्याने तात्काळ तक्रारी अजार्ची नोंद घेतली तसेच ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविण्यात आली.

सायबर पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांची ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बँक खात्यात थांबविण्यात आली. त्याचप्रमाणे तक्रारदार याची बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणुची रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयात याचिका सादर केलेली, त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी मा. न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त केले.

अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी बँकेसोबत तसेच मा. न्यायालय यांचेकडे पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली रूपय ३, ४९, ५३४ /- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.

अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

* Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.
* facebook, Watsapp, Instagram अथवा Telegram Channel, वर जास्त परतावा देणाऱ्या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
* कोणत्याही ऍप ची पडताळणी केल्याशिवाय डाऊनलोड अथवा Investment ऍप मध्ये गुंतवणुक करु नये.
* अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर ऍड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवून फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.
* जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणाऱ्या कोणत्याही ट्रेडिंग ऍप वर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ऍप ची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.
* ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधन तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचेसह सपोनि /स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी / प्रसाद शेनोळकर, सफौ / फर्नांडिस, पोअं/ सावन शेवाळे, मपोहवा / माधुरी धिंडे, मसुब / प्रविण सावंत सायबर पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे.

सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०

सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईटः-www.cybercrime.gov.in

## मोटार सायकल चोरी करणाऱ्या सराईतास पोलिसांनी केली अटक

**■पालघर :**

मोटारसायकल चोरी करणाऱ्या आरोपीस स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचेकडून अटक.अधिक माहितीनुसार दिनांक १५/०७/२०२४ रोजी पालघर पुर्व येथील रेल्वे स्टेशन जवळ पार्किंग करुन ठेवलेली मोटार सायकल हि कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली बाबत फियार्दी श्री. रतिष अमोल भोपी वय १८ वर्षे रा. मानवत कोळीपाडा, ता. जि. पालघर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पालघर पोलीस ठाणेयेथे गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच दिनांक २०/११/२०२४ रोजी फियार्दी श्री. मिलन अजित पंजाबी वय २९ वर्षे रा. सुंदरम नाका, गिरनार रेसिडेन्सी, पालघर ता. जि. पालघर यांची पालघर पुर्व रेल्वे स्टेशन जवळ पार्कींग करुन ठेवलेली मोटार सायकल हि कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली याची देखीलपालघर पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला. असे दोन वेगवेगळे गुन्हे पालघर पोलीस ठाणे येथे दाखल करण्यात आले. वरील प्रमाणे दोन्ही गुन्हयामधील चोरीस गेलेल्या वाहनांचा व अज्ञात आरोपी याचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणणेकरीता श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर व श्री. अभिजीत धाराशिवकर, उप विभागीय पोलीस अधिकारी, पालघर उप विभाग यांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे यातील आरोपी याचा पोलीस निरीक्षक श्री. प्रदिप पाटील स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांच्या पथकाने गुन्हयाचा समांतर तपास करीत तांत्रीक पध्दतीने तसेच गोपणीय माहितीच्या आधारे शोध घेतला असता इसम बिजय क्रिष्णा गोष वय ४३ वर्षे व्यवसाय - मजुरी सध्या रा. फ्लॅट नं. बी / ३०४, ओम वास्तु, ३ रा माळा, डोंगरपाडा, विरार ( प ) ता. वसई जि. पालघर, मुळ रा. ग्राम - एम- ११० वासंती कॉलनी, राऊरकेला, उडीसा याने सदरचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असुन त्यास विरार परीसरातुन ताब्यात घेवुन वरील दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत. सदरची कामगिरी श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर व श्री. अभिजीत धाराशिवकर, उप विभागीय पोलीस अधिकारी, पालघर उप विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. प्रदीप पाटील, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, पोउनि / रविंद्र वानखेडे, पोहवा./९३६ संदीप सरदार, पोहवा./ दिनेश गायकवाड, व पोहवा./राकेश पाटील, सर्व नेमणूक - स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा./भगवान आव्हाड, नेमणूक- पालघर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

## सुमारे १०,०५,६५२/- रु फेसबुक वरून शेअर ट्रेडिंग ची फसवणुकी तील रक्कम पोलिसांनी तक्रारदारास केली परत

**■भाईंदर:**

Facebook Group वरील Share Trading मध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन तक्रारदार यांची फसवणुक केलेल्या रक्कमेपैकी १०,०५,६५२/- रु तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश. सविस्तर माहिती अशी कि मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील भाईंदर पोलीस ठाणेच्या हद्दीत राहणारे तक्रारदार श्रीमती. शहा यांनी ऑनलाईन शेअर ट्रेंडिंग करुन अधिक रक्कम मिळत असल्याने S.M.C.Globle ऍप वर रक्कमेची गुंतवणुक केली. परंतु तक्रारदार यांना कोणताही परतावा मिळाला नाही. त्यावर तक्रारदार यांची आर्थिक फसवणुक झाल्याने सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज सादर केल्याने तात्काळ तक्रारी अजार्ची नोंद घेतली तसेच ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविण्यात आला. सायबर पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांची ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बँक खात्यात थांबविण्यात आली. तक्रारदार यांची बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणुची रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयात याचिका सादर केलेली, त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी मा. न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त केले. अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी बँकेसोबत तसेच मा. न्यायालय यांचेकडे पाठपुरवा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली रूपय १०,०५,६५२/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे. अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

* Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.
* facebook, Watsapp, Instagram A±fUf Telegram Channel, वर जास्त परतावा देणाऱ्या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
* कोणत्याही ऍपची पडताळणी केल्याशिवाय डाऊनलोड अथवा Investment ऍपमध्ये गुंतवणुक करु नये.
* अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर अँड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवून फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.
* जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणाऱ्या कोणत्याही ट्रेडिंग ऍपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ऍपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.
* ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचेसह सपोनि/ स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/ प्रसाद शेनोळकर, मपोअं/ स्नेहल पुणे, पोअं/ कुणाल सावळे, मपोहवा / माधुरी धिंडे, सुब / प्रविण सावंत सायबर पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे.

सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०

सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट

## सुमारे ४,८९,०००/– तक्रारदाराची फसवणुकी मधील टेलिग्राम ग्रुप मधील शेअर ट्रेडिंग ची रक्कम पोलिसांनी केली परत

**■विरार:**

Telegram Group वरील Share Trading मध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन तक्रारदार यांची फसवणुक केलेल्या रक्कमेपैकी ४,८९,०००/- रु परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश. सविस्तर माहिती अशी कि मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील धनावडे पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार श्री.धनावडे यांनी टेलीग्राम ऍपवर शेअयांनी पैशांची गुंतवणुक केली. परंतु त्यांना कोणताही परतावा न मिळाल्याने आर्थिक फसवणुक झाल्याचे तक्रारदार यांचे लक्षात आले. त्या अनुषंगाने तक्रारदार यांनी सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज सादर केल्याने सदर बाबत नोंद घेवुन तक्रारदार यांची NCCRP Portal वर तक्रार नोंदविण्यात आली.

सदर प्रकरणी सायबर कक्षाने तक्रारदार यांची ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बँक खात्यात थांबविण्यात आली. तक्रारदार यांची बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणुची रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयात याचिका सादर केलेली, त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी मा. न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त केले.

अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी बँकेसोबत तसेच मा. न्यायालय यांचेकडे मागील ०८ महिने सातत्याने पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली रुपए ४,८९,०००/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.

अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

* Telegram Channel, facebook, Watsapp, Instagram अथवा वर जास्त परतावा देणा-या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
* अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर ऍड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवून फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.
* जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणाऱ्या कोणत्याही ट्रेडिंग अँप वर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग अँप ची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.
* Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.
* कोणतेही अनाधिकृत क्ल्लvestment एप्लिकेशन डाऊनलोड करु नये अथवा अनोळखी लिंकवर क्लिक करुन नये.
* आपली वैयक्तिक तसेच बँकेसंबंधीत गोपनीय माहिती कोणासही उघड करु नये.
* ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सपोनि / स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोअं/ सुवर्णा माळी, पोअं/ राहुल बन, पोअं/ विलास खाटीक, मपोहवा / माधुरी धिंडे यांनी पा पाडली आहे.

सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०

सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईटः-www.cybercrime.gov.in

## जिवे मारण्याची धमकी देऊन चाकूने वार करणाऱ्या सराईतास पोलिसांनी केली अटक

**■नालासोपारा:**

चाकुने वार करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस ०१ वषार्नंतर अटक करून गुन्हा उघडकीस आणण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश. अधिक माहितीनुसार दिनांक २१.१२.२०२३ रोजी १२.२० च्या सुमारास साई रोहीणी सोसायटी, राजनगर सर्कल, नालासोपारा पुर्व येथे फियार्दी अकिंत धर्मेंद्र मिश्रा यास आरोपी अबु शेख व इरफान यांनी बाहेर बोलावुन अगोदरच्या भांडणाचा राग मनात धरुन आरोपी यांनी फियार्दीस शिवीगाळी, दमदाटी करुन त्याच्या पोटावर व पाठीवर चाकुने वार करुन आपखुशीने जबर दुखापत करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन आचोळेपोलीस ठाण्यात दिनांक २१.१२.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता . गुन्हा दाखल झाल्या पासुन पाहीजे आरोपी आरोपी अबु शेख व इरफान हे पोलीसांना मिळुन येत नव्हता .

सदरबाबत मा. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी गंभीर व संवेदनशील गुन्हयातील पाहीजे आरोपीचा शोध घेणेबाबत पोलीस



पथकास आदेश केले होते. वरील गुन्हा अतिशय गंभीर स्वरुपाचा असल्याने तसेच नमुद गुन्हयातील आरोपी इरफान याचा पुर्व नांव, पत्ता निष्पन्न नसल्याने यापुर्वी सवोतोपरी शोध घेऊन देखील तो गेल्या ०१ वषार्पासुन मिळुन येत नव्हता. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी राहुल राख यांनी पोउपनिरी. हितेंद्र विचारे, पोहवा. संतोष मदने, राजाराम काळे, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, पोअं. आकिल सुतार असे तपास पथक तयार केले.

नमुद पोलीस पथकाने सदर गुन्हयाची आचोळे पोलीस ठाणेतुन माहीती घेतली परंतु आरोपी याचे फक्त इरफान नांव निष्पन्न होते. पाहीजेत आरोपीचे पुर्ण नांव, गांवाचा पत्ता व सद्याचा पत्ता मिळुन येत नव्हता. नमुद पोलीस पथकाने सलग २ महीने अहोरात्र परीश्रम घेवुन आरोपीचे नाव इरफान तुफेल शेख, रा. जैनबिया अपार्टमेन्ट, बोरी कॉलनी, अचोळा रोड, नालासोपारा पुर्व असे असल्याचे निष्पन्न केले होते.

नमुद आरोपीचा सध्याचा ठावठिकाणा व इतर सर्व माहिती प्राप्त करीत असताना आरोपी हा सनशाईन सर्कल, नालासोपारा पुर्व येथे येणार असल्याची माहीती पोहवा. संतोष मदने यांचे गुप्तबातमीदाराकडुन प्राप्त झाल्याने नमुद ठिकाणी वरील पोलीस पथकाने शिताफीने साफळा लावुन त्यास दिनांक ०५.१२.२०२४ रोजी शिताफिने ताब्यात घेवुन प्राथमिक चौकशीत त्याचा सदर गुन्हयात सहभाग दिसुन आल्याने पुढील कारवाई करीता आचोळे पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) व श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोनि. श्री. राहुल राख, सपोनि दत्तात्रय सरक, नितीन बेंद्रे, पोउपनि हितेंद्र विचारे, सहापोउपनि श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, पोहवा. संतोष मदने, राजाराम काळे, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, सतिष जगताप, हनुमंत सुर्यवंशी, महेश वेल्हे, संग्रामसिंग गायकवाड, प्रविणराज पवार, राजविर संधु, अनिल नागरे, पोअं अकिल सुतार, साकेत माघाडे, नितीन राठोड, मसुब सचिन चौधरी, सफौ. संतोष चव्हाण सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.

## रेल्वेत स्फोटकांचा दूरध्वनी, निघाले फटाके

**■ मुंबई :** अमृतसर एक्स्प्रेसच्या डब्यात दोन गोण्यांमध्ये स्फोटके ठेवण्यात आल्याचा दूरध्वनी आल्यानंतर सर्वच यंत्रणा सतर्क झाल्या. तपासणीत ते फटाक असल्याचे निष्पन्न झाले. ज्वलनशील पदार्थ रेल्वेहून आणल्यामुळे याप्रकरणी रेल्वे कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेल्वे पोलिसांना एक दूरध्वनी आला होता. दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीने अमृतसर एक्स्प्रेस गाडी क्रमांक ११०५८ मधील सामानाच्या डब्यात पांढऱ्या रंगाच्या गोणीत स्फोटके असल्याची माहिती दिली. त्या गोणींवर तिरूपती टॉईज असे नमुद करण्यात आल्याचेही दूरध्वनी करणाऱ्याने सांगितले. त्यानंतर रेल्वे पोलिसांनी मुंबई पोलिसांना याबाबची माहिती दिली. ही माहिती मिळताच सर्व यंत्रण सतर्क झाल्या. रेल्वेतील पार्सल असल्यामुळे रेल्वे सुरक्षा दलाला (आरपीएफ) पाचारण करण्यात आले. वाडीबंदर येथे सर्व पार्सल उतरवल्यानंतर रेल्वेतील लगेज डबा क्रमांक २०३५८४ ची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान दोन गोणींमध्ये फटाके असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी रेल्वेतून स्फोटके आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कसारा लोकलमधील प्रवाशावरील हल्ल्यातील आरोपीचा जामीन कल्याण न्यायालयाने फेटाळला

**■कल्याण :** कसारा लोकलने प्रवास करत असताना चार जणांनी टिटवाळा ते वासिंद दरम्यान एका प्रवाशासह त्यांच्या तीन सहकाऱ्यांवर जीवघेणा हल्ला केला होता. एप्रिल महिन्यात ही घटना घडली होती. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या प्रवाशाचा रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला होता. या प्रकरणातील दोन जणांना कल्याण लोहमार्ग पोलिसांनी पकडले होते. त्यानंतर त्यांना जामीन होऊन बाहेर आले होते. खुनाचा गुन्हा नोंद होताच या दोन जणांना पोलिसांनी पुन्हा पकडले होते. या प्रकरणातील एका मारेकऱ्याचा जामीन कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधिश आर. जी. वाघमारे यांनी फेटाळून लावला.

लोकलमध्ये प्रवाशाला मारहाण सुरू असताना एका जागरूक प्रवाशाने त्या मारहाणीची मोबाईलच्या माध्यमातून एक दृश्यचित्रफित तयार केली होती. ती चित्रफित समाज माध्यमांवर सामायिक केली होती. या समाज माध्यमांवरील चित्रफितीचा आधार घेऊन मारहाणीत गंभीर जखमी होऊन नंतर रुग्णालयात उपचार घेत असताना मृत झालेले दत्तात्रय भोईर यांच्या नातेवाईकांनी याप्रकरणी मारेकऱ्यांना कठोर शिक्षा करण्याची मागणी न्यायालयाकडे केली होती. समाज माध्यमातील ही चित्रफित पोलिसांनी पाहिली. न्यायालयात मृताचे नातेवाईकाचे वकीलपत्र घेणाऱ्या ॲड. सागर कदम यांनी न्यायालयात दाखल केली. या चित्रफितीमुळे या घटनेला सबळ पुरावा मिळाला, असे मयताचे तक्रारदार नातेवाईक यांचे वकील ॲड. सागर कदम यांनी सांगितले.

गंभीर जखमी झालेल्या दत्तात्रय भोईर या प्रवाशाचा नंतर मृत्यू झाल्याने याप्रकरणातील मारेकरी तनुज जम्मुवाल यांच्यासह तीन जणांवर खुनाचे कलम प्राथमिक तपासणी अहवालात नंतर लावण्यात आले. जामिनावर बाहेर आलेल्या दोन संशयितांमधील मारेकरी तनुज व साथीदारावर खुनाचे कलम दाखल होताच पोलिसांनी त्यांना अटक केली होती. त्यानंतर तनुजने जामिनासाठी कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज केला होता. मयत प्रवाशाच्या तक्रारदार नातेवाईक यांचे वकील ॲड. सागर कदम यांनी गुन्हा दाखल मारेकऱ्याचे प्रकरण जामिनासाठी सुनावणीला आले. त्याला जोरदार हरकत घेतली. ॲड. कदम यांनी न्यायालयाला घडलेल्या घटनेची माहिती कथन केली. त्याच बरोबर जागरूक नागरिकाने तयार केलेल्या मारहाणीच्या दृश्यचित्रफितीची कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधिश आर. जी. वाघमारे यांनीही दखल घेतली. दोन्ही बाजुंचे कथन ऐकून न्यायालयाने मारेकरी तुनजचा जामीन अर्ज फेटाळून लावला. या प्रकरणातील दोन जण अद्याप फरार आहेत.

एप्रिलमध्ये दत्तात्रय भोईर, प्रदीप शिरोसे आणि त्यांचे दोन सहकारी सीएसएमटी-कसारा लोकलने प्रवास करत होते. याच डब्यातून मारेकरी तुनज आणि त्यांचे तीन साथीदार प्रवास करत होते. हे दोन्ही गट दरवाजाजवळ उभे राहून गप्पा, हास्य करत प्रवास करत होते. मारेकऱ्यांचा गट आपल्याकडे पाहून हास्य करत असल्याने मयत दत्तात्रय भोईर आणि साथीदारांनी आमच्याकडे पाहून का हसता म्हणून समोरच्या गटाला प्रश्न केला. त्याचा राग येऊन मारेकऱ्यांनी भोईर यांच्यासह साथीदार प्रदीप शिरोसे यांना पट्ट्याने मारहाण केली. त्यांच्यावर चाकू हल्ला केला. या हल्ल्यात भोईर, शिरोसे गंभीर जखमी झाले होते. कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल होता.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ्र गाळा नं. ४, एन.के.इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ्र श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणा-या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८ . Email ID : policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE – UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At – 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist – Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor – Mr. Dr. Deepak MoreshwarNaik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com